बृहन्मुंबई महानगरपालिका
ई मेल : stenodeanl@gmail.com, dean.ltmg@mcgm.gov.in, फोन नं.: 022 24063001 / 02
लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व
लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय शीव , मुंबई-२२
क्र. लोटिरु / 105 / वि. आ. , दि. 06.09.2021

# सूचना परिपत्रक

संदर्भ – अति. आयुक्त् (प.उप.) यांची क्र.AMC/WS/1838/D दि.24.07.2020
अन्वयेची मंजूरी.

लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील व्यवसायोपचारशास्त्र विभागातील 01 सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील कर्मचारी सहयोगी प्राध्यापक या पदावर पदोन्नत झाल्यामुळे 01 सहाय्यक प्राध्यापक रिक्त झाले आहे.

तरी अति.आयुक्त (प.उप.) यांच्या AMC/WS/1838/D दि.24.07.2020 च्या मंजुरीच्या अनुषंगाने अर्हताप्राप्त उमेदवारांकडून स्थानिक पातळीवर सदर पद भरण्यात येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी अर्जासह अधिष्ठाता, लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, शीव, मुंबई 400 022,यांच्या दालनात सोबत जोडण्यात आलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रत्यक्ष मुलाखतीकरीता उपस्थित रहावे. उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रे व झेरॉक्स प्रती मुलाखतीच्यावेळी घेऊन यावीत.

**<u>पदाचा तपशील:-</u>** सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पद कंत्राटी तत्वावर भरण्याचा तपशील खालीलप्रमाणे:

| **अनु .क्र.** | **विभागाचे नाव** | **रिक्त पदे** | **मुलाखतीचे ठिकाण** |
|---|---|---|---|
| 1 | व्यवसायोपचारशास्त्र विभाग | **01** | व्यवसायोपचारशास्त्र विभाग<br>**दि.15.09.2021 वेळ सकाळी 11.30 वा.** |

**<u>शैक्षणिक अर्हताः</u>-** उमेदवार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तसेच मान्यताप्राप्त विद्यापीठातून संबंधित विषयातील पदव्युत्तर पदविका असणे आवश्यक आहे.

सदर पदासाठी (**शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक बी एम सी - 2519/ प्र.क्र.343/ नवि – 21 , दिनांक 08 जानेवारी, 2021 चे विवरणपत्र " अ " ) " बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख वैदयकीय महाविदयालय आणि रूग्णालयाच्या आस्थापनेवरील व्यवसायोपचारशास्त्र विभागातील ' सहाय्यक प्राध्यापक ' या पदाचे सेवा प्रवेश नियम " सोबत जोडण्यात आले आहेत.**

सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे की, शैक्षणिक (गुणपत्रिका व प्रमाणपत्रे), एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, मराठी विषय घेऊन एस.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण, इत्यादीच्या प्रमाणित प्रतीलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**<u>अनुभवः</u>-**

सदर नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर एकावेळी चार महिन्यापेक्षा जास्त नाही, इतक्या कालावधीकरीता, प्रत्येक चार महिन्यानंतर एक दिवस सेवाखंड देऊन पुनर्नेमणूक अथवा महानगरपालिका वैद्यकीय निवड मंडळामार्फत (M.M.S.S.Board) अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल अशा स्वरुपात करण्यांत येईल.

**<u>वयाची अटः-</u>** सर्वसाधारण उमेदवाराकरीता वय 18 वर्षांपेक्षा कमी व 38 वर्षांपेक्षा अधिक नसावे व मागासवर्गीयांकरीता 43 वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**<u>वेतनश्रेणीः-</u>** उमेदवाराचे ठोक मासिक वेतन रुपये 100000/- (रूपये एक लाख मात्र ) असे असेल.

सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी तत्त्वावर असल्यामुळे नियुक्त करण्यात येणा-या उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना व भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 व मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होणार नाही.

1. जे उमेदवार म.न.पा.सेवेत असतील त्यांनी अर्ज भरण्याकरीता त्यांच्या खातेप्रमुखांची ना हरकत प्राप्त करणे आवश्यक आहे.
2. उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराचा फ़ोटो लावावा व त्यावर त्यांनी उपलब्ध जागेत स्वाक्षरी करावी.
3. उमेदवाराने अर्जावर भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा.
4. उमेदवारांनी मुलाखातीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.
5. उमेदवारांनी सध्या ते कार्यरत असलेल्या संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
6. उमेदवारांनी त्यांच्या अर्जात (MMC / MCI) चा नोंदणी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
7. PROFESSIONAL INDEMNITY POLICY

उमेदवारांनी मुख्य लिपिक (रोख) यांचे कडून दिनांक 07.09.2021 पासून ते 13.09.2021 पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी 11.00 पासून ते दुपारी 3.30 पर्यंत ) अर्ज प्राप्त करता येतील व अर्ज जमा करण्याची अंतिम दिनांक 13.09.2021 संध्याकाळी 04 : 30 वा. पर्यंत .

अर्ज विक्री शुल्क खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| खुला प्रवर्गासाठी | – | रु.300 + जी.एस.टी. |
| राखीव प्रवर्गासाठी | – | रु.200 + जी.एस.टी. |

सही/- दि. 03.09.2021

अधिष्ठाता

लो.टि.म.स.रूग्णालय, शीव.

(शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक बीएमसी-2519/प्र.क्र.343/नवि – 21 ,दिनांक 08 जानेवारी, 2021 चे विवरणपत्र “ अ ” )

“ बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख वैदयकीय महाविदयालय आणि रूग्णालयाच्या आस्थापनेवरील व्यवसायोपचारशास्त्र विभागातील ‘ सहाय्यक प्राध्यापक ’ या पदाचे सेवा प्रवेश नियम ”

**सदर पद खालील अर्हताधारक असणा-या उमेदवारांमधून निवडीने भरण्यात येईल :-**

1. उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत नसल्यास उमेदवाराचे वय 38 वर्षापेक्षा अधिक नसावे व मागासवर्गीयांसाठी वय 43 वर्षापेक्षा अधिक नसावे.
2. उमेदवार मान्यताप्राप्त विदयापीठाच्या व्यवसायोपचार विषयातील पदवी ( B.O. Th./ B.Th.O./ B.Sc.O.T./B.O.T.) सह पदव्युत्तर पदवी ( M.O. Th./ M.Th.O./ M.Sc.O.T./M.O.T.) किमान 55 टक्के गुणांसह किंवा बिंदुनामकाप्रमाणे समतुल्यश्रेणी धारण करणारा असावा.
3. या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवाराने मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळालेली नसेल तर त्याने सदर परिक्षा प्रचलित धोरणानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.
4. या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवाराने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणी किंवा वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल.

सही/- दि. 03.09.2021
अधिष्ठाता
लो.टि.म.स.रूग्णालय, शीव.